# सिंहगड परिसरातील रस्त्यांची बिकट अवस्था



धायरी (बारांगणा) येथील रस्त्यावर मोठ मोठाले खड्डे असल्याने त्या रस्त्याला तळ्याचे स्वरूप आले आहे. पावसाळ्यापूर्वी खड्डे बुजविण्यात यावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. (छाया : मीनाक्षी गुरवसे)

**सिंहगड (प्रतिनिधी) : सिंहगड रस्त्यावरील डांबरीकरण, रस्तारुंदीकरणाचे काम झाले; पुण परिसरातील अंतर्गत रस्तादुरुस्तीकडे लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केले असल्याचे दिसते आहे.**

धायरी गावातील धायरी, बारांगणा रस्त्यावर गुडघाभर पाणी साचेल एवढे मोठमोठे खड्डे या रस्त्यावर आहे. हा मार्ग महत्त्वाचा व रहदारीचा असून लिंक रोड म्हणून समजला जाणारा हा रस्ता थेट नांदेड फाट्याला जाऊन सिंहगड रोडला मिळतो. त्यामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पावसाळा आल्याने खड्ड्यांची खोली पाहता पाणी साचले तर वाहनचालकांची पंचाईत होणार असे चित्र दिसते. या रस्त्याची दुरुस्ती पाऊस सुरू होण्याअगोदर व्हावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली.

सिंहगड रस्त्यावरील येथील तुकाई नगर, वेणूताई कॉलेज या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली आहे. कॉलेज-शाळा असलेल्या या मार्गाची अवस्था बघता पावसाळ्यात होणारी विद्यार्थ्यांचे व नागरिकांचे हाल होणार हे रस्त्याची दुर्दशा बघता लक्षात येते.

विठ्ठलवाडी, हिंगणे खुर्द, आनंदनगर, सनसिटी सारख्या प्रगतीशील परिसरातील अंतर्गत रस्त्यांचीही हीच अवस्था झाली आहे.

मागच्यावर्षी पुणे मेळ खड्ड्यात या समस्येने पुणे मनपाची झोप उडविली व रस्ता डांबरीकरणाची कामे करण्यात मनपा गुंतली. रस्तारुंदीकरण, डांबरीकरण झाले पण ते केवळ मुख्य मार्गावरील. अंतर्गत रस्ते मात्र आजही खड्ड्यांच्या सान्निध्यात कायम राहिले आहे. पावसाळा सुरू होण्याची लक्षण बघता



हिंगणे-खुर्दमधील हा अंतर्गत रस्ता खड्डेमय झाला आहे. अतिशय अरुंद असलेल्या या रस्त्यावरून पीएमटीची ये-जा सुरू असते. अशावेळी हे खड्डे धोकादायक ठरू शकतात.

मागच्यावर्षी पावसाळ्यात झालेले हाल यंदाही होणार असल्याची भिती आहे. नागरिकांनी व्यक्त केली आहे. तसेच आपआपल्या सोयीनुसार आपल्याच परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण काही लोकप्रतिनिधींनी केले असल्याचा आक्षेपही स्थानिकांनी दै. 'पुढारी' जवळ व्यक्त केला.

केवळ मुख्य रस्ता सुधारित असणे म्हणजे परिसराचा विकास झाला असे म्हणता येणार नाही. तर अंतर्गत रस्त्यांची डागडुजी, डांबरीकरण होणे आवश्यक आहे. कारण स्थानिक रहिवाशांचा तो रस्ता नित्य उपयोगात येत असतो. बांधकाम व्यावसायिक स्वतःच्या सदनिकांसमोरील रस्ते स्वखर्चाने सुधारतात कारण ती त्यांच्या व्यवसायाची गरज असते. मनपाला रस्ते विकासासाठी जो निधी दिला जातो, त्यात केवळ मुख्य रस्त्याचे काम करणे एवढेच नसते तर अंतर्गत रस्तेही सुधारीत करण्यासाठी या निधीमधून खर्च केला जातो. तेव्हा प्रशासनाने रस्ता दुरुस्तीबाबत दिलेल्या निधीचा पुरेपूर उपयोग होतो आहे की नाही याकडे लक्ष देणे गरजेचे आहे अशी प्रतिक्रिया ॲड. कुलकर्णी यांनी व्यक्त केली आहे.

प्रत्यक्षरूपाने सुरू झाला नसला तरी पावसाचे आगमन झाले आहे. तत्पूर्वी अंतर्गत रस्त्यांचा विचार करण्यात यावा. अन्यथा आंदोलनाचा मार्ग आम्हाला घ्यावा लागेल असा तीव्र प्रतिक्रिया नागरिकांनी केली आहे.

सिंहगड भागातील अंतर्गत रस्त्यांची कामे शंभर टक्के झाली असल्याचे लोकप्रतिनिधींनी सांगितले असतांनाही रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे दिसतात, तर काही रस्ते एका पावसातच खराब झाल्याने रस्त्यांची अवस्था झाली आहे.

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.